दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ८० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१३ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# प्रत्येक रायगडकरास मिळणार उत्तम आरोग्य सुविधा : ना.आदिती तटकरे

## अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लवकरच होणार कार्यान्वित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्याची पालकमंत्री या नात्याने प्रत्येक रायगडकरास उत्तम आरोग्य सुविधा मिळावी यासाठी मी कटिबध्द आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय व आवारातील सोयी-सुविधा, अलिबाग शासकीय महाविद्यालय अशा विविध बाबींचा मी सतत पाठपुरावा करीत असून येणाऱ्या काळात प्रत्येक रायगडकरास उत्तम आरोग्य सुविधा मिळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले. जिल्हा सामान्य रुग्णालय व आवारातील सोयीसुविधांची पाहणी करण्याकरिता तसेच अलिबाग शासकीय महाविद्यालय कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा आढावा घेण्यासाठी त्या अलिबाग जिल्हा रुग्णालय येथे आल्या होत्या, त्याविषयी एमआयडीसी विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीच्या वेळी त्या बोलत होत्या.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ.गिरीष ठाकूर, पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे खासगी सचिव डॉ.जगन्नाथ वीरकर, कार्यकारी अभियंता राहुल मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार सचिन शेजाळ, मानसोपचार तज्ञ तथा समुपदेशक डॉ.अमोल भुसारे, आरटीपीसीआर लॅब समन्वयक डॉ.शितल जोशी, कनिष्ठ अभियंता श्री.राहुल बागूल, कनिष्ठ अभियंता कु.धनश्री भोसले आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या पाहणी दौऱ्यादरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयातील अंतर्गत रस्ते, प्रशासकीय इमारत, वैद्यकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, जिल्हा परिषदेचे आरोग्य प्रशिक्षण केंद्र, पार्किंग, गॅरेज, वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाची जागा (गारबेज युनिट), मीटर रुम, ऑक्सिजन प्लँट, लेक्चर हॉल, वाचनालय, नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधा अशा विविध कामांची पाहणी केली. या पाहणी दरम्यान निरीक्षणात आलेल्या बाबींसंबंधी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना शक्य तितक्या लवकर ही कामे पूर्ण करण्याविषयीचे निर्देश दिले.

त्याचबरोबर अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचाही पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आढावा घेतला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथील प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून सुरू होणार असल्याने त्यादृष्टीने आवश्यक असणारी संबंधीत कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे या सतत पाठपुरावा करीत आहेत.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक यंत्रसामुग्री, वैद्यकीय उपकरणे खरेदीकरिता २ कोटी ९८ लाख ५३ हजार ७९८ रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे ४ टप्प्यात एकूण ५१० पदे निर्माण करण्यासही शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे. हे वैद्यकीय महाविद्यालय तातडीने कार्यान्वित होण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ ४४ अध्यापकांची प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्याविषयीचे आदेशही जारी करण्यात आले आहेत. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग सुरु करण्याकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा अपुरी असल्यामुळे राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, थळ,अलिबाग या संस्थेच्या मौजे कुरुळ येथील वसाहतीतील जुनी शाळा, टाईप ए रेसिडन्सी क्वॉर्टरच्या सहा इमारती तसेच शाळेजवळची सहा एकर मोकळी जागा प्रति विद्यार्थी रु.२ हजार प्रति सेमिस्टर (शासकीय वसतीगृह शुल्क) इतक्या भाडयाने ३ वर्षाकरिताचा सामंजस्य करारही झाला आहे.

> या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या १०० जणांची पहिली तुकडी साधारणतः ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात सुरु होईल. हे लक्षात घेवून अत्यंत काटेकोरपणे कालबध्द नियोजन करुन अभ्यासवर्ग, प्रयोगशाळा, वाचनालय, वसतिगृह, प्रशासकीय इमारत आदि कामे पूर्ण होण्यासाठी संपूर्ण क्षमतेने सर्वांनी मिळून काम करण्याची आवश्यकता असल्याचे संबंधीत अधिकाऱ्यांना सांगितले. इंडियन मेडिकल कौन्सिलच्या निकषाप्रमाणे अटी व शर्तींची पूर्तता काटेकोरपणे करणे, हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. यासाठी पुढील दोन महिने संबंधीत प्रत्येक अधिकाऱ्याने नेमून दिलेल्या कामाच्या जबाबदाऱ्या झपाटून पूर्ण कराव्यात. सर्वांनी एकजुटीने काम केल्यास येणाऱ्या काळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु होवून प्रत्येक रायगडकरास उत्तम आरोग्य सुविधा मिळेल.
>
> **: कु.आदिती तटकरे, पालकमंत्री**

## संक्षिप्त...

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार ; आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरातील एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी जबरदस्तीने वारंवार शारिरीक संबंध ठेवणाऱ्या आरोपीला पेण पोलिसांनी गजाआड केले आहे.

पेण शहरातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पेण शहरातीलच संशयित आरोपी श्रेयस सुरेश बाटे ( वय १९) राहणार बाटेवाडा, नंदीमाळ नाका याने १ डिसेंबर २०२० ते ८ जून २०२१ या कालावधीत सदर अल्पवयीन मुलीशी जबरदस्तीने वारंवार शारिरीक संबंध ठेवल्याने ही अल्पवयीन मुलगी ५ महीन्याची गर्भवती राहिली आहे.

या बाबत अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून पेण पोलिसांनी संशयित आरोपी श्रेयस बाटे याच्या विरूद्ध गुन्हा रजिस्टर नं.१५४/ २०२१ भा.द.वि.कलम ३७६, ३७६ ( २ ), बाल लैंगिक संरक्षक कायदा २०१२ प्रमाणे अटक केली आहे.

या बाबत उप विभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण , पोलीस निरीक्षक गौरीप्रसाद हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मीनल शिंदे या अधिक तपास करत आहेत.

## खारघर परिसरातील धबधब्यांवर ३० सप्टेंबर पर्यंत पर्यटकांना बंदी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसराला निसर्गाचा वरदहस्त लाभला आहे. वनराईने नटलेला डोंगराळ भाग व नैसर्गिक पर्यावरण यामुळे खारघरच्या सौंदर्यात अधिकच भर पडते. विशेषतः पावसाळ्यात खारघर परिसरात धबधबे ओसंडून वाहत असल्याने दरवर्षी निसर्गप्रेमी, पर्यटक पर्यावरणाचा आनंद लुटण्यासाठी मोठी गर्दी करत असतात. खारघरमधील डोंगराळ भागात पावसाचे पाणी पडल्यामुळे मोठया प्रमाणात ठिकठिकाणी पाण्याचे झरे निर्माण होतात. खारघर परिसरातील पांडवकडा, चाफेवाडी, फणसवाडी, ड्रायव्हिंग रेंज, घामोळे गाव, ओवे कॅम्प डोंगर, धरण परिसर, तळोजा कारागृहासमोरील डोंगर व तळोजा समोरील तलाव तसेच आजूबाजूच्या परिसरात पावसाचे लहान–मोठे धबधबे दरवर्षी निर्माण होतात. त्यामुळे या परिसरात पावसाळी पिकनिकचे स्वरूप प्राप्त होते. डोंगरावरून वाहणाऱ्या पाण्यामुळे पांडवकडा, चाफेवाडी, फणसवाडी व ओवे कॅम्प धरण व आजूबाजूच्या परिसरात मोठमोठे धबधबे तयार होतात. त्यामुळे पर्यावरणाचा आस्वाद घेण्यासाठी दर शनिवारी व रविवारी तसेच इतर सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटक व निसर्गप्रेमी धबधब्याच्या भिजण्यासाठी व पोहण्यासाठी याठिकाणी येत असतात.

परंतु काही वेळेला धबधब्यावरून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहातसोबतच डोंगरावरील लहान–मोठे दगड घरंगळत येऊन धबधब्याखाली बसलेल्या तसेच पाण्याच्या डोहात पोहण्यासाठी गेलेल्या पर्यटकांच्या डोक्या त पडून त्यांना गंभीर दुखापती झाल्याच्या घटनाही यापूर्वी घडल्या आहेत. तसेच धबधब्यामुळे तयार झालेल्या पाण्याच्या डोहाच्या खोलीचा अंदाज न आल्याने अनेक पर्यटक पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडल्याचे प्रकारही यापूर्वी अनेकदा घडले आहेत. अशीच एक घटना मागील वर्षीही घडली आहे. ४ तरूणी पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मृत्युमुखी पडल्या होत्या. त्यामुळे वारंवार अशा घटना घडू नये यासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी पनवेल विभाग, नवी मुंबई पोलीस यांच्याकडून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ अन्वये दिनांक ०७ जून ते ३० सप्टेंबर २०२१ या कालावधीत सदर प्रतिबंधित ठिकाणी जाण्यासाठी मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

खारघर परिसरात पावसाळ्यात विलोभनीय सृष्टीसौंदर्य पहावयास मिळते. परंतु हा संपूर्ण परिसर अतिशय दुर्गम व भटकंती करण्यासाठी ..../२

> खारघर परिसरातील सृष्टीसौंदर्यामुळे पर्यटकांना पर्यावरणाचा आनंद घेण्यासाठी याठिकाणी येण्याचा मोह आवरत नाही. परंतु सदरचा परिसर अत्यंत दुर्गम व धोकादायक असल्याने याठिकाणी यापूर्वी अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागले आहेत. मागील वर्षी याठिकाणीच ४ तरुणी दुर्दैवाने एका दुर्घटनेत मृत्युमुखी पडल्या होत्या. त्यामुळे याप्रकारच्या वारंवार दुर्घटना घडू नये हाच यामागील मुख्य हेतू आहे. या अनुषंगाने खारघर परिसरातील सर्व रहिवाशी व पर्यटकांना सुचित करण्यात येते की, सदर प्रतिबंधित क्षेत्रात पर्यटन करताना कोणी व्यक्ती निदर्शनास आल्यास त्यांच्यावर खारघर पोलीस ठाण्याकडून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> **- शत्रुघ्न माळी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खारघर)**

## सिडकोने उभारलेल्या पत्रकार भवनाची माहिती सचिवांकडून पाहणी



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

राज्याचे माहिती व जनसंपर्क सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी सिडकोने उभारलेल्या नवी मुंबईतील पत्रकार भवनाची पहाणी केली.

त्यांच्या समवेत कोकण विभागाचे उपसंचालक डॉ.गणेश मुळे, नवीमुंबई प्रेसक्लबचे अध्यक्ष श्री.मनोज जालनावाला हे होते. नवी मुंबई शहर, परिसरात पत्रकारांसाठी सिडकोने उभारलेली वास्तू भविष्यात माध्यमांसाठी, पत्रकारांसाठी उपयोगात येऊ शकते. माहिती व जनसंपर्क विभागाला देखील भविष्यात या भवनाचा उपयोग होवू शकेल असे डॉ.पांढरपट्टे यांनी सांगितले. सिडकोकडून या भवनाची उभारणी करण्यात आली असून आतील कामे सुरु आहेत.

## श्रीवर्धन तालुक्यातील तोक्ते चक्रीवादळग्रस्त अद्याप मदतीपासून वंचितच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मे महिन्याच्या १६ व १७ तारखेला संपूर्ण कोकण किनारपट्टीला तोक्ते चक्रीवादळाने जोरदार तडाखा दिला. हे वादळ अरबी समुद्राच्या दक्षिणेला तयार झाल्यानंतर ते अरबी समुद्र मार्गे गुजरातच्या किनार्यावर धडकणार होते. परंतु वादळाने केरळ, कर्नाटक त्याचप्रमाणे तळ कोकण, कोकण या परिसरामध्ये आपली झलक दाखवलीच. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याजवळुन वादळ पुढे सरकत असताना ते किनाऱ्यापासून दीडशे ते दोनशे किलोमीटर आत मध्ये होते. तरी सुद्धा ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याने अनेक ठिकाणी नागरिकांची छपरे उडाली. काही ठिकाणी झाडे पडली. तर काही घरे, गुरांचे गोठे यांचे अंशतः नुकसान झाले. निसर्ग चक्रीवादळाच्या वेळी परिस्थिती वेगळी होती. कारण निसर्ग चक्रीवादळ हरिहरेश्वर व श्रीवर्धन समुद्र किनारपट्टीवर धडकले. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

श्रीवर्धन तालुक्यातील ९० टक्के घरां वरील छपरे उडून गेली होती. तर ८० टक्के नारळ, सुपारीच्या बागा त्याचप्रमाणे आंबा–काजूच्या बागा उद्ध्वस्त झाल्या होत्या. मात्र तोक्ते वादळाच्या वेळी नुकसानीचे प्रमाण अत्यल्प होते. मागच्या वादळात महावितरणचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. परंतु या वादळामध्ये अतिशय कमी प्रमाणात नुकसान झाले. वादळ होऊन गेल्यानंतर राज्याचे आपत्ती निवारण, मदत व पुनर्वसन ..../२

## तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या पाठपुराव्याने म.औ.वि.मंडळाचे प्रादेशिक कार्यालय पनवेलमध्ये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन आणि अध्यक्ष सतीश (अण्णा) शेट्टी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय पनवेल येथे सुरू होत आहे. तसे आदेश नुकतेच म.औ. वि.मंडळाने काढले असून सोमवार दि.१४ जून पासून सर्व कारभार पनवेल येथील खांदा कॉलनी येथे असलेल्या कार्यालयातून सुरू होणार असल्याचे तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने प्रसिद्ध केले आहे.



मागील बऱ्याच वर्षापासून तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने तळोजा एमआयडीसी परिसरात असणाऱ्या कंपन्यांसाठीचे प्रादेशिक कार्यालय पनवेल येथे सुरू होण्यासाठी पाठपुरावा केला होता. तळोजा एमआयडीसीमध्ये असणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या दैनंदिन कामासाठी २५ कि.मी.वर दूर असणाऱ्या महापे येथील कार्यालयामध्ये फेऱ्या माराव्या लागत होत्या. त्यासाठी बराच वेळ आणि ऊर्जा वाया जात होती. तळोजा एमआयडीसीमध्ये लहान–मोठ्या एकूण १६२२ कंपन्या असून त्यांना प्रत्येक छोट्या–मोठ्या कामासाठी ठाणे जिल्ह्यातील महापे येथील प्रादेशिक कार्यालयामध्ये जावे लागत होते. महापे येथील प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या चार एमआयडीसीमधील कंपन्यांची व्याप्ती एकूण ७७५८ च्या आसपास असल्याने तेथे असलेल्या कामांचा पसाराही मोठा होता. प्रत्येक कामासाठी असंख्य फेऱ्या माराव्या लागत होत्या. त्यामुळे बराचसा वेळ वाया जात होता. त्या तुलनेने पनवेल येथील प्रादेशिक कार्यालयामध्ये ७ एमआयडीसी मिळून फक्त १८०७ इंडस्ट्रीज आहेत. महापे येथील कामांची व्याप्ती लक्षात घेता कामांचा निपटारा जलद गतीने होण्याकरिता प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने प्रादेशिक कार्यालय महापे यांच्या अखत्यारीत येत असलेल्या तळोजा, अतिरिक्त तळोजा, पाताळगंगा, अतिरिक्त पाताळगंगा या औद्योगिक क्षेत्राची सर्व कामे तसेच खालापूर टप्पा क्र.१ व ३ येथील भूसंपादनाची कामे प्रादेशिक कार्यालये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पनवेल यांच्याकडे वर्ग करण्यात आली. तळोजा एमआयडीसीपासून केवळ ९ कि.मी.वर असणाऱ्या पनवेल येथे प्रादेशिक कार्यालय सुरू झाल्याने तळोजा इंडस्ट्रीयल परिसरातील कंपन्यांना सोयीस्कर झाले आहे. तळोजा एमआयडीसीतील कंपन्यांच्या व्यवस्थापनाने तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन व अध्यक्ष सतीश (अण्णा) शेट्टी यांचे आभार मानले.

## द्रोणागिरी किल्ल्याची तात्काळ डागडुजी करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

वादळी वारा पावसात आज ऐतिहासिक बेलापूर किल्याचा बुरूज ढासळल्याची घटना घडली. त्याच धर्तीवर उरणमधील द्रोणागिरी किल्ल्याची ही मोठ्या प्रमाणात पडझड होण्यास सुरुवात झाली आहे. तरी बेलापूर येथील किल्ल्याप्रमाणे द्रोणागिरी किल्याची दुरवस्था होऊ नये यासाठी या किल्ल्याच्या डागडुजीकडे तात्काळ शासनाने लक्ष देऊन आर्थिक निधी द्यावा. अशी मागणी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे उरण येथील सामाजिक कार्यकर्ते घनश्याम कडू यांनी केली आहे.

पडणाऱ्या वादळी पावसाचा झटका ऐतिहासिक बेलापूर किल्याला बसत बुरूज ढासळला आहे. अनेक महिन्यापासून डागडुजीचे काम सुरू होते अशाच प्रकारचा प्राचीन काळापासून उरण बंदर म्हणून प्रसिध्द आहे. त्याकाळी बंदराच्या संरक्षणासाठी उरण गावाभोवती तटबंदी बांधण्यात आली होती. तसेच उरण बंदराचे रक्षण करण्यासाठी करंजा बेटावरील द्रोणागिरी डोंगरावर किल्ला बांधला होता. आजही हा द्रोणागिरी किल्ला अस्तित्वात आहे. विषेश म्हणजे कोणत्याही ..../२

# माथेरान घाटरस्त्याला संरक्षण जाळी बसविण्यासाठी मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांचे सा.बां.विभागाला पत्र

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान घाटरस्त्यावरील अति धोकादायक दरडी कोसळून जीवितहानी होण्या अगोदरच या ठिकाणी संरक्षण जाळ्या लावून संभाव्य धोका टाळता यावा यासाठी माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केला आहे.

पावसाळी पर्यटनासाठी माथेरानला हमखास पर्यटकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. लॉक डाऊन मुळे पर्यटकांना बंदी असली तरी सुद्धा लवकरच १५ जून पासून माथेरान मधील एकंदरीत भौगोलिक परिस्थिती आणि इथल्या सर्वसामान्य लोकांचे जीवनमान हे केवळ पर्यटनावर अवलंबून असते त्यामुळे हे पर्यटनस्थळ अनलॉक करण्यात येणार आहे त्यामुळे इथल्या निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची रेलचेल वाढणार आहे. इथे येण्यासाठी फक्त नेरळ ते माथेरान हा एकमेव घाटरस्ता असल्याने या मार्गावर खाजगी वाहने तसेच पर्यटक स्वतःच्या वाहनाने तर प्रेमी युगुले ही दुचाकी वर स्वार होऊन हजेरी लावतात.शनिवारी आणि रविवारी तर या घाटरस्त्यावर एकप्रकारे जत्रेचे स्वरूप प्राप्त होते नेरळ पासुन जुम्मापट्टी रेल्वे स्टेशन पर्यंत या घाटरस्त्यावर तसेच वॉटर पाईप स्टेशन भागात आणि दस्तुरी जवळील चांगभले मंदिराच्या दुसऱ्या वळणावर असलेल्या घाटात मोठ्या प्रमाणावर दरडी असून त्या निसटलेल्या अवस्थेत आहेत त्यामुळे अतिवृष्टीमुळे अथवा वादळी पावसाने केव्हाही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.



नुकताच माळशेज घाटात भली मोठी दरड रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका वाहनावर येऊन पडली होती त्यावेळेस सुदैवाने चालक गाडीच्या बाहेर उभा होता त्यामुळे जीवितहानी टळली.

माथेरान घाटरस्त्यावर अशाप्रकारे असणाऱ्या दरडी कोसळण्याच्या आधीच त्यांना संरक्षण जाळी(नेट ) बसविण्यात याव्यात जेणेकरून संभाव्य धोका टाळू शकतो.पावसाळी पर्यटनासाठी पावसाळ्यात पर्यटक आपल्या वाहनाने जीव मुठीत धरून येत असतात त्यांच्या तसेच नियमित वर्दळ असलेल्या या मार्गावर दरडी पासून बचाव करण्यासाठी नेट बसविणे आवश्यक आहे.

याकामी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा वन संरक्षक समितीचे सदस्य नितीन विश्वनाथ सावंत यांनी दोन दिवसांपूर्वी घाटरस्त्यावरील धोकादायक दरडींचे फोटो मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांना सादर करून यावर ठोस उपाययोजना कराव्यात याबाबत विनंती केल्यानुसार प्रशांत जाधव यांनी ताबडतोब सार्वजनिक बांधकाम विभागाला त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय, उप विभागीय अधिकारी कर्जत, तहसीलदार कर्जत, उप वनसंरक्षक अलिबाग यांना निवेदन पत्र सादर केले आहे. त्यामुळे लवकरच यावर काहीतरी ठोस उपाययोजना नक्कीच करण्यात येईल असा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत.

# दहा ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचे लोकार्पण उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते संपन्न



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या पुढाकारातून चार व्हेंटिलेटर्स आणि उद्योग मंत्री सुभाष देसाई यांच्या पुढाकारातून दहा ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचे लोकार्पण काल (दि.११रोजी) रात्री उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.उदय सामंत यांच्या हस्ते महाड येथील औद्योगिक वसाहतीतील एम.एम.ए कोविड सेंटर येथे संपन्न झाले.

यावेळी आमदार भरत गोगावले, जिल्हा परिषद सदस्य संजय कचरे, उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद, पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.सामंत म्हणाले की, नेहमीच प्रशासनालाच दोष देऊन चालणार नाही. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, महसूल विभाग चांगल्या पद्धतीने काम करीत आहेच. मात्र आपण देखील कोविडसारख्या संकटात आपापली जबाबदारी ओळखून काम करणे, नियमांचे काटेकोरपणे पालन करणे महत्त्वाचे आहे. प्रशासन,शासन या पलीकडे जाऊन आम्ही हे काम करीत असून या मागचा उद्देश एकच आहे की, रुग्णांचा मृत्यू दर कमी व्हायला हवा. रुग्णांची संख्या कमी व्हायला हवी. व्हेंटिलेटरच्या वापरासाठी आवश्यक फिजिशियनस् बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून तातडीने पेमेंट बेसेसवर आवश्यकतेप्रमाणे फिजिशियनस् उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. कोणत्याही परिस्थितीत दिलेले व्हेंटिलेटर फिजिशियनस् नाही म्हणून बंद अवस्थेत राहायला नकोत, ते गरजू रुग्णांसाठी कार्यान्वित राहायला हवेत, याची दक्षता घेण्यात येईल.

# मालमत्ता कर भरा, महापालिकेचा मेसेज, आत्माराम पाटील दाखल करणार जनहित याचिका

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

नागरिकांवर कोणत्याही कराचा पहिले पाच वर्ष बोजा न देण्याचे आश्वासन देऊन निर्माण केलेल्या पनवेल महापालिकेच्या प्रशासनाने नागरिकांना आता पूर्ण पाच वर्षाचा मालमत्ता कर भरण्याचे मेसेज पाठवून कोरोना काळात चांगलाच दणका दिला आहे. यामुळे नागरिकांमधून संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी २०२१ पर्यंत सिडकोला ही सेवा कर भरला असल्याने पुन्हा महापालिकेला कर कसा भरायचा हा यक्षप्रश्न उभा ठाकला आहे. महापालिकेने नागरिकांना तशा कोणत्याही सेवा दिल्या नसल्याने महापालिकेला कर का द्यायचा असा सवाल करून कळंबोलीतील ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम शेठ पाटील महापालिकेच्या जाचक मालमत्ता कराच्या धोरणाविरोधात जनहित याचिका दाखल करणार आहेत. याबाबत पनवेल महापालिकेचे आयुक्त डॉ. सुधाकर देशमुख यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की महापालिकेचा मालमत्ता कर हा सर्वांना भरावाच लागेल. सिडको हे अन्य व्यवस्थापन असल्याने सिडकोचा सेवा कर हा वेगळा आहे. त्यामुळे दंडव्याज लागण्या अगोदर मालमत्ता कर सर्वांनी भरून महापालिकेला सहकार्य करावे.

१ ऑक्टोंबर २०१७ रोजी पनवेल महापालिकेची स्थापना करण्यात आली. यावेळी महापालिकेच्या निवडणुकीत नागरिकांना आश्वासन देण्यात आले की पहिले पाच वर्षे नागरिकांवर कोणत्याही कराचा बोजा पडणार नाही. मात्र दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासून नागरिकांना मालमत्ता कराचा बोजा लादल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पूर्वी सिडकोला नागरिक सेवा कर भरत होते. त्या सेवा करांमधून नागरिकांना सर्व सोयीसुविधा सिडको प्रशासन देत होते. काही अल्प सेवा करा मध्ये सिडको नागरिकांना सेवा व सुविधा देत असताना महापालिकेने आकारलेला मालमत्ता कर हा सिडकोचा सेवाकराच्या दसपटी पेक्षाही जास्त असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. काही महिन्यापूर्वी मालमत्तांचे महापालिकेकडून सर्वेक्षण करण्यात आले होते व त्यावेळी मालमत्ता कर किती असेल याची पूर्वकल्पना नागरिकांना दिली होती. त्यावर अनेक गृहनिर्माण संस्था किंवा नागरिकांनी आक्षेपही घेतले होते. मात्र त्या आक्षेपांना समाधानकारक उत्तर महापालिकेचे प्रशासन कधीच येऊ शकले नाही. मात्र आज शुक्रवारी कळंबोली मधील अनेक हजारो नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचा मेसेज भ्रमणध्वनीवर आल्याने नागरिकांचे धाबे दणाणले आहेत .कोरोना काळात नागरिकांचे उत्पन्नाचे साधनच हीराहून गेल्याने हा मालमत्ताकर का भरायचा कसा भरायचा या विवंचनेत येथील नागरिक अडकले आहेत. तसे पाहता अद्यापपर्यंत सिडको वसाहतीमधील नागरिकांना सर्व सुविधा पुरवीत होती. महापालिकेने त्याप्रमाणात कोणत्याही सुविधा दिलेल्या नाहीत. जर महापालिका सेवा देत नसेल तर कर का भरायचा असा प्रतिप्रश्न येथील नागरिक करीत आहे. तसेच सिडकोलाही नागरिकांनी मार्च २०२१ पर्यंत सेवा कर भरला असताना महापालिकेने २०१७ पासून ते २०२२ पर्यंत ची मालमत्ता कराची आकारणी केली असल्याने त्या विरोधात नागरिक जन आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. याबाबत जर सिडको सर्व सोयीसुविधा देत असेल व महापालिका कोणती सेवा देत नसेल तसेच सिडकोला मार्च २०२२ पर्यंत जर सेवाकर भरला असेल तर महापालिकेला मालमत्ता कर का द्यायचा . एकाच नागरी सुविधेसाठी नागरिकांनी दोन सेवा कर का भरायचे. महापालिकेच्या जाचक लादलेल्या कराच्या विरोधात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा कळंबोलीतील ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम शेठ पाटील यांनी दिला आहे.

# मुंबईवरून गावी आलेल्या २१ वर्षीय तरुणाचा नदीत बुडून मृत्यू

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कोविड काळात मुंबई येथून आपल्या गावी पहुर येथे आलेल्या २१ वर्षीय तरुणाचा येथील धरणाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, प्रथमेश गणेश पहुरकर (२१ ) रा. पहुर, ता. रोहा, रायगड हा युवक कोविड काळात मुंबई येथून आपल्या गावी कोलाड पहुर येथे एका महिन्यासाठी आला होता. गुरुवार, दि. १० जून रोजी दुपारी २ वाजता आपली बहीण व ४ मित्रांसोबत तो येथील धरणात पोहण्यासाठी गेला. पोहता पोहता त्याला अचानक दम लागल्याने तो खोल पाण्यात बुडाला. शोध मोहीम सुरू केली. परंतु हा युवक खोल पाण्यात बुडाला असल्याने फार उशिरापर्यंत सापडला नाही. तर सायंकाळी अंधार पडल्याने स्कुबा डायव्हिंग करणे अशक्य होते. त्यामुळे सदरची शोधमोहीम थांबवण्यात आली व दुसऱ्या दिवशी पुन्हा सकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली. या शोध मोहिमेच्या अथक प्रयत्नानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दुपारी पावणे एकच्या दरम्यान रोजी प्रथमेश याचा मृतदेह सापडला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## धबधब्यांवर ३० सप्टेंबर पर्यंत पर्यटकांना बंदी

धोकादायक असल्याने आजवर अनेक पर्यटकांना याठिकाणी आपला जीव गमवावा लागला आहे. काही वेळेला अतिउत्साही पर्यटक पांडवकडा धबधब्यावर येऊन मद्यपान करून धिंगाणा घालत असतात. त्यामुळे पर्यावरणाचा आस्वाद घेण्यासाठी आलेल्या लहान मुलांना व महिलांना त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे मद्यप्राशन करून हुल्लडबाजी करणाऱ्या पर्यटकांमुळेच धबधब्यावर बंदी घालण्यात येते. यावर्षीही प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव पांडवकडा धबधब्यावर पर्यटकांना बंदी घातली आहे. त्यातच काही वेळेला पांडवकडा धबधबा परिसरात दारूच्या बाटल्यांचा ढिगारा पडलेला पाहायला मिळतो. त्यामुळे इथले नैसर्गिक सौंदर्य देखील दूषित होत चालले आहे. त्यातच मागील दोन दिवसांपासून शहरात जोरदार पाऊस झाल्याने खारघर परिसरातील धबधबे ओसंडून वाहण्यास सुरू झाली आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे साहजिकच विकेंडला पर्यावरणप्रेमी तसेच पर्यटकांची पावले पांडवकडा धबधब्यावर वळण्याआधीच खारघर पोलीस ठाण्याच्या वतीने याठिकाणी पर्यटनासाठी येण्यास बंदी घातली आहे.

## तोक्ते चक्रीवादळग्रस्त अद्याप मदतीपासून वंचितच

मंत्री विजय वडेट्टीवार यांनी श्रीवर्धनला भेट दिली. त्यांच्यासमवेत पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांची देखील उपस्थिती होती. श्रीवर्धन तालुक्यात विविध ठिकाणी वादळाची पाहणी केल्यानंतर श्रीवर्धन प्रांत कार्यालयाच्या सभागृहामध्ये विजय वडेट्टीवार यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी ज्या नागरिकांचे नुकसान झाले आहे अशांचे पंचनामे तात्काळ करावेत असे आदेश महसूल यंत्रणेला दिले. त्याप्रमाणे महसूल यंत्रणांनी पंचनामे करून देखील पंधरा दिवस उलटून गेले आहेत. परंतु अद्याप मदतीचा पत्ता नाही. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, रायगडचे खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री आदिती तटकरे यांनी विविध कामांच्या भूमिपूजन व उद्घाटनासाठी श्रीवर्धन येथे कार्यक्रम आयोजित केले. त्यावेळी देखील नुकसानग्रस्तांना तातडीने मदत दिली जाईल असे जाहीर करण्यात आले होते. परंतु अद्याप मदत मिळत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. तरी शासनाने तातडीने नुकसानग्रस्तांना मदत करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## द्रोणागिरी किल्ल्याची तात्काळ डागडुजी करण्याची मागणी

ऋतूत एका दिवसात करता येण्यासारखा हा छोटा आणि सुंदर असा ट्रेक म्हणूनही प्रसिद्ध आहे. या ठिकाणी अनेक भागातील भक्तगण येत असतात. सातवहानांच्या एका शिलालेखात उरण जवळील मोर गावाचा उल्लेख आहे. सातव्या शतकाच्या प्रारंभी पुलकेशी चालुक्याने मौर्यांची घारापूरी ही राजधानी काबीज केल्याचा उल्लेख होळे येथील शिलालेखात आहे. घारापूरी या राजधानी पासून जवळ असणार्या उरण बंदराचे रक्षण करण्यासाठी करंजा बेटावरील द्रोणागिरी डोंगरावर किल्ला बांधला असण्याची शक्यता आहे. द्रोणागिरी किल्ला देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात होता. इ.स.१५३० मध्ये पोर्तुगीजांनी किल्ल्याची डागडुजी केली. १५३५ मध्ये अंतोनो- दो- पोर्तो या पाद्रीने नोसा-सेन्होरे, एन.एस. द पेन्हा व सॅम फ्रान्सिस्को ही चर्चेस बांधली. १६ व्या शतकात काही काळ हा किल्ला आदिलशहाकडे होता. त्यानंतर हा किल्ला इंग्रजांकडे गेला.मुंबई बेटाच्या संरक्षणाच्या दृष्टीने घारापूरी किल्ला, उरण गाव व उरण जवळील करंजा बेटावर असलेला द्रोणागिरी किल्ला महत्वाचा होता. १० मार्च १७३९ ला मानाजी आंग्रे यांनी उरणचा कोट व द्रोणागिरी किल्ला इंग्रजांकडून जिंकून घेतला. परंतु या किल्ल्याकडे दुर्लक्ष झाल्याने आता त्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. याकडे वेळीच लक्ष दिले नाहीतर द्रोणागिरी किल्ल्याचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात येण्याची दाट शक्यता आहे. याकडे लक्ष देत त्याची दुरुस्ती त्वरित करून द्रोणागिरी किल्ल्याचे अस्तित्व अबाधीत राखावे.गेले २ ते ३ दिवसांपासून पडणाऱ्या वादळी पावसाने झोडपून काढले आहेत. याचा फटका ऐतिहासिक बेलापूर किल्ल्याचा बुरुज ढासळण्याची घडना आज घडली. अशीच काही अंशी घटना उरणमधील पुरातन द्रोणागिरी किल्याची पडझड होण्यास सुरुवात झाली आहे. तरी या पुरातन किल्ल्याचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी त्वरित पालकमंत्री आदिती तटकरे यांनी पुढाकार घेऊन शासनाकडून आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी घन:श्याम कडू यांनी केली आहे.

# माणगाव एसटी स्टँण्ड समोर तलाव सदृश्य पाणी



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

काल पासुनच सुरु असलेला संततधार मधेच रिमझीम तर मधेच मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे माणगांव एसटी स्टॅण्डच्या आवारात मोठा तलाव सदृष्य पाणी भरले आहे. या ठिकाणी प्रवाशांना पायी चालणे तसेच एखादे वहान घेऊन आत जाणे धोकादायक झाले असुन आवारात पडलेले खड्डे भरलेल्या पाण्यात गायब झाल्याने या ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या पाण्याचा निचरा होत नसल्याने ही परिस्थिती या ठिकाणी दिसुन येत आहे.

बसस्थानकाचे मागील बाजुस असलेल्या नाल्यातुन या पाण्याचा निचरा होऊ शकतो यासाठी योग्य नियोजन केल्यास ही समस्या सोडविणे शक्य असल्याचे येथील व्यावसायीकांचे म्हणने आहे.

त्याप्रमाणे जेसीबीचा वापर करुन पाणी काढण्यात आले मात्र स्थानकातील स्लॅबची अवस्थाही जिर्ण झाल्याने पडणारे पावसात प्रवाशांच्या जिवाशी खेळ असल्याचे चित्र या ठिकाणी निर्माण झाले असुन राज्य परिवहन महामंडळाने या ठिकाणी तात्काळ लक्ष वेधावे अशी मागणी प्रवासी वर्गातुन होत आहे. या स्थानकातील अवस्था एसटीच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद वाक्याचा विसर पडावा इतकी बिकट असल्याचे बोलले जात आहे.

## जाहीर नोटीस

सूचना देण्यात येते की, श्री. सुशील बाळकृष्ण ठाकूर आणि श्री. समिंद्र बाळकृष्ण ठाकूर, रा. घर नं. ५४, पाटील आळी, मराठी शाळेजवळ, उलवा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ ह्यांची मौजे उलवा, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित केलेली आहे सदर संपादित जमिनीच्या मोबदल्यात त्यांना २२.५ % दराने सिडको कडून खालील वर्णनाचे भूखंड मिळालेले आहेत. (ह्यापुढे त्यांचा उल्लेख सदरहू भूखंडधारक असा करणेत येईल)

**मालमत्तेचे परिशिष्ट**

| भूमी संपादक निवाडा क्र. | सर्वेक्षणा नुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे संपादित जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाड्या नुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
| ULV-ICIG-60 | UL, UL-145 | ११०.१६ | निवासी | १०१.०१ | उलवे (उपरोक्त प्रमाणे) | २४ | १७९ | ३१०.०० |

सदरहू भूखंड, सदरहू भूखंड धारकांनी मेसर्स विसा डेव्हलपर्स (भागीदारी संस्था) ह्यांना ५० %- ५० % प्रमाणे विकसित करण्यासाठी दिनांक ०१/०६/२०२१ रोजीच्या नोटराईज्ड विकसन करारानुसार त्यातील अटी शर्तीनुसार देण्याचे ठरविले आहे.

उक्त मिळकती संदर्भात कोणाही व्यक्ती/ संस्था / कंपनी ह्यांचा विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी /संस्थांनी/कंपनी ह्यांनी तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रांसहीत नोटराईज्ड प्रती खऱ्या नक्कल म्हणून खालील निम्नस्वाक्षरीकाराकडे शॉप नं.२६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ए, सीबीडी बेलापूर, ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४. येथे आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते. अन्यथा सदर मिळकतीवर त्यांनी तो जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

**दिनांकः १३.०६.२०२१**

**स्वाक्षरी /-**
**सुनिता राम पाटील**
**खरेदीदाराचे वकील**
**९८६७६८८७८८**
SMS whatsaap only)
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C. & A)
**(वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार)**

## जाहीर नोटीस

सूचना देण्यात येते की, आमचे आशिल मे. समिंद्र बाळकृष्ण ठाकूर हयांनी हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिनचे कायम खरेदीखतने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- गावठाण, ता. उरण, जि. रायगड.**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गावठाण | ३८ | ३/ब | ०-३०-५० पो.ख.०-०१-३० ०-३१-८० | ६.३१ |
| वर नमुद मिळकतीपैकी दूसरेपक्षी यांच्या हिश्याला आलेल्या अविभाज्य हिश्यातील फक्त ०-०३-०० (०३ गुंठे) मिळकतीचा विक्री व्यवहार.... | | | | |

(यापुढे सदर जमिनीचा उल्लेख सदरहू मिळकत असा केला आहे.) सदरहु मिळकतीचे मालक श्री. अमृत नधुराम मढवी यांचेकडून सदरहू मिळकत ही दिनांक ०४.०६.२०२१ रोजीच्या कायम खरेदी खताने . त्यात नमूद अटी व शर्तीवर खरेदी केली आहे. सदर जमिनीच्या मालकानं सदरहू मिळकतीचे सर्व हक्क व अधिकार हे माझे अशील यास तबदील करण्याचे मान्य केले आहे. परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती बद्दल कोणाही व्यक्ती / संस्था /कंपनी ह्यांचे कोणत्याही प्रकारे विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, बक्षिसपत्र, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्ती / संस्था / कंपनी ह्यांनी. तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रासहित नोटराईज्ड प्रती खऱ्या नक्कल म्हणून खालील निमनस्वाक्षरीकाराकडे शॉप नं.२६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ए, सीबीडी बेलापूर, ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४. येथे आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते. अन्यथा सदर मिळकतीवर त्यांनी तो जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

**दिनांकः १०.०६.२०२१**

**स्वाक्षरी /-**
**सुनिता राम पाटील**
**खरेदीदाराचे वकील**
**९८६७६८८७८८**
(SMS whatsaap only)
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C. & A)
**(वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार)**

## जाहीर नोटीस

सूचना देण्यात येते की, आमचे आशिल मे. सुशील बाळकृष्ण ठाकूर हयांनी हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिनी कायम खरेदीखतने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- गावठाण, ता. उरण, जि. रायगड.**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गावठाण | ३८ | ३/ब | ०-३०-५० पो.ख.०-०१-३० ०-३१-८० | ६.३१ |
| वर नमुद मिळकतीपैकी दूसरेपक्षी यांच्या हिश्याला आलेल्या अविभाज्य हिश्यातील फक्त ०-०३-०० (०३ गुंठे) मिळकतीचा विक्री व्यवहार.... | | | | |

(यापुढे सदर जमिनीचा उल्लेख सदरहू मिळकत असा केला आहे.) सदरहु मिळकतीचे मालक श्री. अमृत नधुराम मढवी यांचेकडून सदरहू मिळकत ही दिनांक ०४.०६.२०२१ रोजीच्या कायम खरेदी खताने. त्यात नमूद अटी व शर्तीवर खरेदी केली आहे. सदर जमिनीच्या मालकानं सदरहू मिळकतीचे सर्व हक्क व अधिकार हे माझे अशील यास तबदील करण्याचे मान्य केले आहे. परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती बद्दल कोणाही व्यक्ती / संस्था /कंपनी ह्यांचे कोणत्याही प्रकारे विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, बक्षिसपत्र, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्ती / संस्था /कंपनी ह्यांचे. तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रासहित नोटराईज्ड प्रती खऱ्या नक्कल म्हणून खालील निमनस्वाक्षरीकाराकडे शॉप नं.२६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ए, सीबीडी बेलापूर, ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४. येथे आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते. अन्यथा सदर मिळकतीवर त्यांनी तो जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

**दिनांकः १०.०६.२०२१**

**स्वाक्षरी /-**
**सुनिता राम पाटील**
**खरेदीदाराचे वकील**
**९८६७६८८७८८**
SMS whatsaap only)
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C. & A)
**(वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार)**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# कोरोनामुक्त गावासाठी सकारात्मक पाऊल

कोरोना कोरोना करत दोन वर्षे सरली आतापर्यंत कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी सर्वात प्रभावी उपाययोजना ठरली ती म्हणजे लॉकडाऊन. सारखा सारखा लॉकडाऊन जनतेला काय शासनालाही परवडणार नाही. शासनाने कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी विविध उपाययोजना केल्या. जनतेनेही शासनाच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन केले. त्यामुळेच आज दूसऱ्या लाटेचाही सामना यशस्वीपणे करता आला. आता तिसऱ्या लाटेला कसे थोपवता येईल यासाठी शासनाचे कशोसीने प्रयत्न चालू आहेत. शक्यतो तिसरी लाट येऊच नये,यासाठी शासन नवनवीन उपाययोजना आखत आहे. राज्यातील अनेक सरपंच व गावांनीसुध्दा कोरोनाला आपल्या गावच्या वेशीवर रोखण्याचा विविध चांगले उपक्रम राबविलेले आहेत.

मागच्या वर्षी शहरी भागात कोरोनाचा प्रादूर्भाव मोठया प्रमाणात होता. कोरोनाच्या भितीने शहरातील जनता मोठया संख्येने आपापल्या गावी गेली. त्यामुळे कोरोना ग्रामीण भागातही पोहोचला आहे. कोरोनाचे संकट लवकरात लवकर संपवायचे असेल तर, गाव–पातळीवरील ग्रामपंचायत सरपंचांनी आपापले गाव कोरोनामुक्त करण्यातसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

आपले राज्य कोरोनामुक्त व्हावे यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये कोरोनावर मात करण्याची जिद्द उत्पन्न व्हावी 'कोरोनामुक्त गांव स्पर्धा योजना' राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सरपंचांनी गावाचे पालक म्हणून जबाबदारी घ्यावी व शासनाच्या सूचनांप्रमाणे विविध उपाययोजना राबवून 'माझे गाव, कोरोना मुक्त गाव' चे ध्येय लवकर साध्य करावे असे आवाहन मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात केले आहे.

कोरोनाचे समुळ उच्चाटण करण्यासाठी 'कोरोनामुक्त गाव स्पर्धा योजना' या स्पर्धेत जास्तीत जास्त गावांनी सहभाग घेणे आवश्यक आहे.या स्पर्धे तील नियमानुसार राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने कोरोनामुक्तीसाठी ग्रामपंचायतीच्या स्तरावर पाच पथकांची स्थापना करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी नेमून दिलेली कार्ये करणे, निकषानुसार गुणांकन करणे व ग्रामपंचायतीने स्वयंमुल्याकन संबंधित गट विकास अधिकारी यांना सादर करावायाचे आहे. पथकांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

पथक क्रमांक–१ कुटूंब सर्वेक्षण पथक (ग्रामपंचायत प्रभाग निहाय)– सदर पथक वार्ड, तांडा, वाडी अथवा वस्तीनिहाय ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य सेविका/अंगणवाडी सेविका/आशा वर्कर/जिल्हा परिषद शिक्षक तसेच अन्य संस्थेचा प्रतिनिधी (स्वयंसेवक) इत्यादी सदस्यांच्या समावेश करून संबंधित ग्रामपंचायतीनी पथकाची स्थापना करावी. हे पथक कुटूंबातील प्रत्येक सदस्याची कोविड–१९ संबंधित आजाराची लक्षणे ऑक्सीजन पातळी, ताप, सर्दी, खोकला, थकवा आणि इतर लक्षणे असलेल्या व्यक्तीच्या नोंदी घेणे, प्रत्येक कुटूंबाला भेट देताना कोविड–१९ च्या सर्व नियमांचे पालन करून कुटूंबातील वृध्द व्यक्ती, लहान मुले, गरोदर स्त्रीया यांची घ्यावयाची काळजी यांचे नियम समजावून सांगणे, AUTOIMMUNE DISEASE श्वसनासंबंधीचे दमा किंवा इतर आजार, मधुमेह, उच्च रक्तदाब (HYPER TENSION) आजाराची माहिती घेणे व तद्संबंधीत आजाराची व्यक्ती आढळल्यास अशा रुग्ण व्यक्तींची यादी करणे व त्यांना योग्य उपचार घेणे व त्याबाबत विशेष काळजी घेण्याचे आवाहन करणे ही सर्व कामे करेल.

पथक क्रमांक–२ विलगीकरण कक्ष स्थापन करून पुढीलप्रमाणे कार्ये करण्यात यावे– कोविड–१९ विलगीकरण कक्ष सरकारी नियमानुसार संबंधित प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व ग्रामपचांयतीमधील कार्यरत अधिकृत डॉक्टर यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात यावे. त्यात दोन स्वतंत्र कक्ष तयार करून त्यामध्ये बाधित व्यक्ती आणि संपर्कातील व्यक्तींना स्वतंत्र कक्षात ठेवण्यात यावे, कोविड–१९ विलगीकरण कक्षात २४ तास गरम पाणी ठेवण्यात यावे व शौचालय स्वच्छ ठेवावीत, कोविड बाधित रुग्णांच्या आहार व औषध उपचारावर नियमित लक्ष ठेवणे, गावातील रुग्णांची लक्षणे वाढत असल्यास तात्काळ हेल्पलाईन पथकातील डॉक्टरांना सूचित करणे.

पथक क्रमांक–३ कोरोना तपासणीसाठी रुग्णालयात भरत करण्यासाठी घेऊन जाणाऱ्या वाहन चालकांचे पथक– विलगीकाण कक्षातील लोकांना आवश्यकतेनुसार रुग्णालयात डमीट करण्याची गरत असेल त्यासाठी गावातील उपलब्ध गाडया त्यांच्या येण्या–जाण्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने कोरोना तपासणीसाठी व रुग्णालयात भरती करण्यासाठी घेऊन जाणाऱ्या वाहन चालकांचे पथक ग्रामपंचायतीच्या स्तरावर गावातील वाहनचालकांची स्वंयसेवक म्हणून निवड करून पथकांची स्थापना करावी.

पथकाची कार्ये– पथकातील वाहन चालकाने रुग्णासाठी वापरात असलेल्या वाहनात वाहन चालकाच्या सीटच्या मागे प्रोटेक्टिव्ह शिल्ड लावणे, प्रोटेक्टिव्ह शिल्डच्या मागे रुग्णांना बसून हॉस्पिटलला घेऊन जाणे व लगेच गाडी निर्जंतुक करणे, या पथकातील वाहन चालकांनी केलेल्या कार्यामुळे रुग्ण स्वत:च्या कुटूंबातील किंवा इतर व्यक्तीना तपासणीसाठी सोबत घेऊन जाण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे रुग्णाबरोबर थेट संपर्क टाळल्यामुळे कोविड–१९ चा प्रसार रोखण्यास मदत होईल. पथक क्रमांक–४ कोविड हेल्पलाईन पथक– सदर पथकामध्ये गावातील खाजगी डॉक्टर, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र/केंद्र येथील डॉक्टर, फॉर्मासिष्ट (औषध निर्माता) आणि इतर क्षेत्रातील लोकांचा समावेश करून ग्रामपंचायतीने डॉक्टर हेल्पलाईन पथकांची स्थापना करावी.

कोविड–१९हेल्पलाईन पथकाची कार्य– कोविड–१९ पॉझिटिव्ह आलेल्या रुग्णांना आवश्यक ते उपचार तातडीने डॉक्टरांचे सहाय्य घेऊन चालू करण्यास मदत करणे, रुग्णाची वेळोवेळी तपासणी करणे व आवश्यक तपासण्या नामपात्र दरात करणे, आवश्यकता असलेल्या रुग्णांना जिल्हयाच्या ठिकाणी मुख्य रुग्णालयात भरती करणे, रुग्ण डमिट करतना बेडच्या उपलब्धतेबाबत व उपचारादरम्यान औषधांच्या कमतरतेबाबत येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यास मदत करणे, कोविड–१९ या आजारानंतर मानवी शरीरात काही गुंतागुंत निर्माण होऊ शकतात. उदा.नवीनच आढळलेला म्युकॉरमायकोसिस आजाराशी साधर्म्य लक्षणाची माहिती देणे व पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात तातडीने पाठविण्याची व्यवस्था करणे, विशेष म्हणजे लहान मुलांची विशेष काळजी घेण्यासाठी कोविड–१९ च्या संबंधीत सर्व सर्व नियम माहिती वेळोवेळी गावातील कुटूंबापर्यंत पोहचविणे.

पथक क्रमांक–५ कोविड–१९ लसीकरण पथक– राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने कोविड–१९ लसीकरण करण्यासाठी तपासणीसाठी ग्रामपंचायतीच्या संबंधित वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र आरोग्य सेविका/आरोग्यसेवक, खाजगी डॉक्टर, स्वयंसेवक आणि ग्रामपंचायत प्रतिनिधी अशा सदस्यांचा समावेश करून पथकांची स्थापना करावी. हे पथक शासकीय नियमानुसार वय वर्षे ४५ विश–षत: जुने आजार उदा.मधुमेह, दमा, उच्च रक्तदाब इत्यादी असणाऱ्या व्यक्तींचे पथकाच्या माध्यमातून प्राधान्याने कोविड–१९ चे लसीकरण करण्यात यावे, लसीकरणासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी अगोदर तयार करून त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयात स्वयंसेवकामार्फत नोंदणी करणे, शासनाच्या धो–रणानुसार कोविड–१९ लसीकरणाच्या बाबतीत कोणत्याही नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, प्रथम कोविड प्रतिबंध लसीकरण १०० टक्के पुर्ण करण्यात येईल असे नियोजन करणे, गावातील नागरिकांची वेळोवेळी न्टीजन टेस्ट करण्याचे ही काम करेल.

सदर योजनेच्या निकषानुसार गुणांकन स्वयंमुल्याकन ग्रामपंचायती तयार करून १ महिन्याच्या कालावधीत संबंधित गट विकास अधिकारी यांच्याकडे पुरस्कारासाठी निवड होण्याच्यादृष्टीने सादर करतील. प्राप्त झालेल्या सर्व ग्रामपंचायतीच्या स्वयंमुल्याकनगट विकास अधिकारी हे तपासणी करून सर्वाधिक गुण प्राप्त १० ग्रामपंचायतींची यादी तयार करून आवश्यक अहवालासह मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे करतील. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे प्राप्त गुणांकन यादीमधील सर्व गावांची तपासणी करून जिल्हयातून सर्वाधिक गुण प्राप्त ३ गावांची शिफारस उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे सादर करतील. उपायुक्त (विकास) हेविभागातील सर्व जिल्हयांकडून प्राप्त झालेल्या गुणांकनाची पडताळणी करून विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने विभागवार प्रथम, द्रितीय आणि तृतीय सर्वाधिक गुण प्राप्त होणाऱ्या ग्रामपंचायतीची अंतिम निवड करतील.

या दोन्ही योजना मिळून प्रथम, द्रितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींना अनुक्रमे (१) रु.५० लाख, २) रु.२५ लाख, ३) रु.१५ लाख इतका निधी ग्रामविकास विभागामार्फत विकास कामासाठी ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार ग्रामपंचायतींना दिला जाईल. कोविड–१९ व्यवस्थापन कोरोनामुक्त गाव स्पर्धेत विजेता ठरलेल्या ग्रामपंचायतींना पुरस्काराची रक्कम वितरीत करण्यात येईल. कोरोनामुक्त गांव स्पर्धेसाठी निकषानुसार सर्वात जास्त गुण प्राप्त ग्रामपंचायतींना राज्यातील ६ महसूली विभाग निहाय प्रत्येक महसुल विभागातून प्रथम बक्षीस रु.५० लाख, रु.२५ लाख, रु.१५ लाख असे तीन विभागवार पुरस्कारांची रक्कम वितरीत करण्यात येईल. निकषानुसार मुल्यांकन करून गुण देण्यासाठी दि.१ जून २०२१ ते ३१ मार्च २०२२ हा कालावधी ग्रामपंचायतींनी केलेले कार्ये विचारात घेण्यात येणार आहे.

या योजनांकरिता निवडण्यात येणारी ग्रामपंचायत शासनाकडून देण्यात आलेल्या निकषांच्या आधारे गुणांकन पध्दतीने पारदर्शकपणे निवड करण्यात येईल. आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव योजना अंतर्गत पुरस्कार वितरण व कोविड–१९ व्यवस्थापन कोरोनामुक्त गांव स्पर्धेत विजेता ठरलेल्या ग्रामपंचायतींना पुरस्काराची रक्कम जिल्हयाच्या ठिकाणी एकत्रित कार्यक्रमात वितरीत करण्यात येईल.

कोविड–१९ व्यवस्थापनासाठी कोरोनामुक्त गाव स्पर्धेसाठीचे निकष व गुणांकन पुढीलप्रमाणे आहेत. १) कोविड–१९ व्यवस्थापनासाठी ग्रामस्तरावर कोरोनामुक्त समितीची निर्मिती करणे. त्यात सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य कर्मचारी, गावातील सर्वसामान्य असणाऱ्या व्यक्तीचा समावेश करणे. २) ग्रामस्तरावर मुख्य समितीच्या अंतर्गत विविध पथकांची निर्मिती करणे त्यात आरोग्य कर्मचारी, खाजगी डॉक्टर व गावातील स्वयंसेवक यांचा समावेश करणे. ३) कोरोनामुक्त गाव होण्यासाठी कोरोना बाधीत कुटूंबाचे सर्वेक्षण व कॉनटॅक्ट ट्रेसिंग करणे. ४) ANTIGEN TEST ची सुविधा गाव पातळीवर उपलब्ध करणे व संशयित रुग्ण संख्येच्या प्रमाणात. ५) ANTIGEN TEST मध्ये POSITIVE आढळलेल्या रुग्णांना तत्काळ पुढील उपचारासाठी डॉक्टरांच्या सल्लयानुसार कोविड केअर सेंटर किंवा हॉस्पिटलमध्ये पाठविणे. ६) ANTIGEN TEST मध्ये NEGETIVE आहे परंतु लक्षणे दिसतात अशा व्यक्तींना संशयित कोविड रुग्ण म्हणून विलगीकरण कक्षात ठेवणे. ७) रुग्णांना विलगीकरण कक्ष किंवा हॉस्पिटल पर्यंत वाहतुकीसाठी वाहनांची व्यवस्था अल्पदरात करणे. ८) कोविड–१९ विलगीकरण कक्षात गरम पाणी/वीज/स्वच्छता/मास्क व सॅनिटायझरची सुविधा उपलब्ध करणे तसेच शौचालयाची साफसफाई नियमितपणे करणे. ९) गावातील खाजगी डॉक्टरांचा व फार्माशिष्ट यांचा कोविड–१९ साठी सक्रिय सहभाग रुग्णांच्या शरीरात प्रतिकारशक्ती निर्माण होण्यासाठी आहार आणि औषधाविषयी मार्गदर्शन करणे लोकसंख्येच्या हजारी प्रमाणात. १०) कुटूंबातील सर्व सदस्य झजड्खढखतए आल्यावर पथकातील स्वयंसेवकामार्फत आवश्यक ती मदत करणे. ११) एखाद्या शेतकरी कुटूंबातील सर्व सदस्य कोविड–१९ झजड्खढखतए आल्यावर त्यांच्याकडील उत्पादित दुध व भाजीपाला अनुक्रमे दुधडेअरी व संबंधित मार्केटला स्वयंसेवकामार्फत पोहच करणे. १२) दूध उत्पादक संस्था, विविध कार्यकारी विकास सोसायटी, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, तंटामुक्त गाव समिती, पतसंस्था यांचा सक्रीय सहभाग. १३) कोरोना बाधित कुटूंबाचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांच्या कुटूंबातील सदस्यांशी आणि संबंधित डॉक्टरांशी कोविड–१९ हेल्पलाईन समिती प्रमुखाने नियमित संवाद साधणे. १४) कोरोना विरहित सुरक्षित कुटूंबाची विशेष नोंद ठेवणे व त्या कुटूंबाना कोरोनाची बाधा होणार नाही यासाठी जनजागृती करणे. १५) कोविड–१९ ची लक्षणे आढळलेल्या रुग्णांना तात्काळ संबंधित पथकातील स्वयंसेवकामार्फत पुढील उपचारासाठी व्यवस्था करणे. १६) कोविड–१९ लसीकरणासाठी मदत करणे व उपलब्ध लसीचे शासकीय नियमानुसार योग्य वाटप. १७) लहान बालकांचे, गरोदर मातांचे सर्वेक्षण करणे. १८) जनजागृतीसाठी केलेले प्रभावी उपाययोजना, विविध तंत्रज्ञानाचा वापर. १९) नोकरीनिमित्त किंवा व्यवसायनिमित्त (चाकरमाने) बाहेरगावी असणाऱ्या व्यक्ती घेतलेली खबरदारी. २०) पथकातील एकही स्वयंसेवक कोरोना बाधित न होण्यासाठी नियमांचे पालन करणे. या सर्व निकषास निकषाच्या प्रमाणानुसार १०० टक्के २ गुण, ७५–९९ टक्के १ गुण, ५०–७४ टक्के ०.५० गुण असतील तर कमाल गुण २ असतील.

मृत्यूदर कमी असावा (गावातील लोकसंख्येच्या हजारी दराप्रमाणे) या निकषास निकषाच्या प्रमाणानुसार संख्या ०–२ गुण, १–१० संख्या १ गुण, १० पेक्षा जास्त संख्या ०.५० गुण असतील तर कमाल गुण २ असतील. तसेच आई वडिलांचे दुदैवाने कोरोनामुळे निधन झाल्यास अनाथ मुलांचा/मुलींचा सांभाळ करणे १०० टक्के ४ गुण, ७५–९९ टक्के ३ गुण, ५०–७४ टक्के २ गुण असतील तर कमाल गुण ४ याप्रमाणे एकूण ५० गुण असतील.

आतापर्यंत ज्या ग्रामपंचायतींनी कोरोना काळात उत्तम काम केले आहे.अशा ग्रामपंचायतींच्या कामांची दखल घेत मा.मुख्यमंत्री महोदयांनी राज्याच्या जनतेला उद्देशून केलेल्या भाषणामधून याचा संदर्भ देऊन त्यांचा गौरव केलेला आहे. मा.मुख्यमंत्री महोदयाच्या आवाहनानुसार आपण आपले कुटूंब, आपला मोहल्ला, आपली वाडी–वस्ती, आपले गांव कोरोनामुक्त केले तर तालुका, जिल्हा व राज्य कोरोनामुक्त होण्यास वेळ लागणार नाही.

**प्रविण रा.डोंगरदिवे**
**माहिती सहाय्यक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## संक्षिप्त...

### अबोली महिला रिक्षा चालक संघटनेच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी स्वखर्चातून खोपोलीतील अबोली महिला रिक्षा चालकांना तसेच गरजू महिलांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप केले.

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी सर्वत्र लॉक डाऊन सुरु आहे. अशामध्ये सर्वसामान्यांच्या अडचणीत वाढच होताना दिसत आहे. लॉकडाऊनमुळे असलेले उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झालेले आहेत. यामध्ये महिला रिक्षाचालकांवरही मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. अबोली महिला रिक्षा चालक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी याबाबीचा गांभीर्याने विचार करुन स्वखर्चाने खोपोली येथील रिक्षा चालक महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे किट उपलब्ध करुन दिले. त्यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत उपस्थित होते. ही मदत मिळाल्याबद्दल अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांचे महिला रिक्षा चालकांनी आभार मानले.

### आदिवासी महिलेला आर्थिक स्वरूपात मदत

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी, कोलाड पोलीस अधिकारी तसेच सुदर्शन कंपनी धाटव यांच्या माध्यमातून कोलाड येथील आदिवासी महिलेला शुक्रवार, दि. ११ जून रोजी दोन बकऱ्या देऊन आणि आर्थिक स्वरूपात मदत केली आहे. कोलाड पोलिस स्टेशन हद्दीतील मौजे कोलाड आदिवासी वाडी येथील महिला सुगंधा आकाश जाधव यांचे पती आकाश जाधव हे पाण्यात बुडून मयत झाले होते. घरात एकटे कमवता असल्याने कुटुंबाचे होणारे हाल व घरात दोन लहान मुले यांची होणारी उपासमारी लक्षात घेता त्यांची उपजीविका भागविण्यासाठी रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सूर्यवंशी, रोहा विभाग व कोलाड सपोनी सुभाष जाधव, कोलाड तसेच सुदर्शन कंपनी धाटाव यांच्या प्रयत्नातून या महिलेला दोन बकऱ्या व मानधन देऊन आर्थिक मदत केली आहे.

## शनिवार रविवारी विकेंड लॉकडाऊनमध्ये मुरुड मधील दुकाने उघडण्यास परवानगी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

भारतीय हवामान विभागाने दि. ०९ जून ते १२ जून या कालावधीत अतिवृष्टीचा इशारा दिल्याने जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी नागरिकांनी बाहेर पडू नये यासाठी शासनाकडून बाजारपेठेतील सर्व दुकाने बंद ठेवण्याचे आदेश प्राप्त झाले होते परंतु अतिवृष्टी त्या प्रमाणात झाली नाही त्यामुळे दुकाने बंद ठेऊन झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे व्यापारी वर्गात नाराजीचा सूर होता.



भाजीसारख्या नाशीवंत मालाचे नुकसानही झाले. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी मुरुड चे तहसीलदार गमन गावित यांनी दिलेल्या आदेशानुसार शनिवारी १२ जून व रविवारी १३ जून रोजी मुरुड मधील सर्व अत्यावश्यक सेवेतील दुकाने सकाळी सात ते दुपारी दोन वाजेपर्यंत कोविड संदर्भातील नियमावलीचे पालन करून सुरु ठेवण्याची आहेत असे मुरुड तालुका व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष नितीन आंबुर्ले यांनी सांगितले. मुरुड शहरात तसेच ग्रामीण भागात कोरोना संसर्ग बाधित रुग्णसंख्या वाढत असून दि. ११ जून रोजी २२ रुग्ण कोरोना बाधित आढळले. तसेच ४ जणांचा यामध्ये मृत्यू झाला आहे. सध्या कोरोना बाधित रुग्णांची संख्या २६७ वर पोह–चली आहे, सुरवातीपासून मुरुड मध्ये एकूण कोरोना संसर्गामुळे ६४ जणांचा मृत्यू झाला असून एकूण रुग्णसंख्या १३६७ झाली आहे हि फार चिंतेची बाब आहे. मुरुड तालुक्यातील राजपुरी गाव नुकतेच कन्टेंनमेन्ट झोन म्हणून जाहीर झाला असून त्यासंदर्भात तेथे फलकही लावण्यात आला आहे. मुरुड तहसीलदार यांनी दि. १२ जून पासून दंडात्मक कारवाईमध्ये बदल करण्यात आल्याचे जाहीर केले आहे. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकणे ५०० रुपये दंड, मास्क परिधान न करणे ५०० रु दंड व क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणे प्रत्येक माणसी २०० रुपये दंड असे नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. वाढत्या रुग्ण संख्येचे गांभीर्य ओळखून मुरुड चे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, पोलीस कर्मचारी सचिन वाणी व सर्व टीम सह बाजारपेठेत हजर राहून विना मास्क फिरणाऱ्यांवर नवीन नियमानुसार दंडात्मक कारवाई केली तसेच नियमांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा नवीन नियमानुसार दंडात्मक/ फौजदारी कारवाई करण्यात येईल असे जाहीर आवाहन केले.

## नवीन पनवेल जवळील सुकलेली झाडे तोडण्यास सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल– माथेरान रोडवरील सुकलेली धोकादायक झालेली झाडे सिडकोतर्फे तोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. नवीन पनवेल येथील कृष्ण रुक्मिणी ट्रस्टतर्फे सुकलेली व धोकादायक झालेली झाडे तोडण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता.

नवीन पनवेल माथेरान रस्त्यावरील एचडीएफसी सर्कल ते आदई सर्कल या साधारण एक किलोमीटरच्या रस्त्यावर दोन्ही बाजूस पूर्णपणे सुकलेल्या झाडांचे खोड उभे आहेत. हे झाडांचे खोड, फांद्या, ऊन, वारा, पाऊस यामुळे कमकुवत झालेले आहेत.

कोणत्याही वेळी अचानक महत्त्वाच्या व वर्दळीच्या रस्त्यावर फांदी किंवा झाड पडून जीवितहानी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. यासाठी कृष्ण रुक्मिणी ट्रस्टतर्फे डॉक्टर कृष्णा देसाई आणि नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ यांच्यातर्फे ही झाडे तोडण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता. मंगळवार पासून ही धोकादायक झाडे तोडण्यास सुरुवात झाली आहे.

## पॉस्को कंपनीचे भंगार घेऊन जाणाऱ्या ट्रेलरची तोडफोड; चालकालाही लुटले!

### कोलाड–भिरा रस्त्यावरील घटना ; चौघांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । रोहा**

पोस्को कंपनीच्या भंगाराचा वाद अजून सुरुच आहे. पोस्को कंपनीचे भंगार घेऊन जाणार्याच ट्रेलरची कोलाड–भिरा रस्त्यावर तोडफोड करुन, वाहनचालकाच्या खिशा–तील पैसे लुटून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी ४ जणांविरोधात कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोलाड–भिरा रस्त्यावर रेल्वे ट्रॅकजवळ गुरुवारी दुपारी ही घटना घडली. फिर्यादी वाहनचालक (रा.तासगाव ता.माणगाव) त्याच्या ताब्यातील ट्रेलरमध्ये पोस्को कंपनी विळे भागाड येथून स्क्रॅप भंगाराचा माल भरुन भिरा कोलाड रस्त्याने जात होता.

कोलाड–भिरा रस्त्यावरील रेल्वे ट्रॅकजवळ मोटारसायकलवरुन आलेल्या चौघांनी अचानक ट्रेलरसमोर मोटारसायकल लावून ट्रेलर थांबवला. तसेच ट्रेलरचालकाला गाडीमधून खाली उतरवून त्यांच्याकडील लाकडी दांडक्याने ट्रेलरची तोडफोड केली. तसेच 'जोपर्यंत मॅटर सॉल्व्ह होत नाही, तोपर्यंत असेच चालू राहणार' असे म्हणून ट्रेलरचालकाच्या खिशामधील २ हजार रुपये रोख रक्कम जबरीने चोरी करुन ते मोटारसायकलवरुन पसार झाले.

दरम्यान, या घटनेप्रकरणी ट्रेलरचालकाच्या फिर्यादीवरुन कोलाड पो–लीस ठाण्यात ४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे चौघेही फरार असून, सहायक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरु आहे.

## सिप्ला कंपनीच्यावतीने पनवेल महानगरपालिकेस ॲन्टीजेन आणि आर.टी.पी.सीआर. टेस्ट किट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रसायनी येथील सिप्ला कंपनीच्या सिप्ला फाऊंडेशनच्या सीएसआर फंडातून पनवेल महानगरपालिकेस ५ हजार ॲन्टीजेन आणि ५ हजार आर.टी.पी.सी.आर किट देण्यात आले. यावेळी सिप्ला कंपनीचे साईट प्रमुख विजय थानगे, सिप्ला फाऊंडेशनच्या सीएसआर हेड उल्का धुरी, आयुक्त सुधाकर देशमुख, उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. पुनम जाधव, सिप्ला फाऊंडेशन सीएसआर मॅनेजर सुनिल मकरे उपस्थित होते.

कोरोना महामारीच्या या काळात नागरिकांना कोरोनाची लागण झाली आहे का नाही याचे अचूक निदान करण्यासाठी ॲन्टीजेन आणि आर.टी.पी.सीआर. टेस्ट करणे गरजेचे असते. महानगरपालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीने एके दिवशी साधारणत: दोन हजार चाचण्या केल्या जात आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणावर चाचण्यांच्या किटची गरज भासत असते. सिप्ला कंपनीच्यावतीने देण्यात आलेले न्टीजन आणि आर.टी.पी.सीआर. किट महापालिकेस कोरोना चाचण्यासाठी अत्यंत उपयोगी असणार आहेत. पुढील काळात सिप्ला कंपनीच्या वतीने महापालिकेस विविध प्रकारची वैद्यकिय मदत करण्याचे आश्वासन यावेळी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिले.



# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून घरकामास जाते असे आईला सांगून घराबाहेर पडलेली अल्पवयीन मुलीचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नावडे गाव परिसरात राहणाऱ्या १७ वर्षीय ०६ महिने या अल्पवयीन मुलीचे कोणीतरी अपहरण केले आहेत. ती रंगाने गोरी, उंची ५ फूट ४ इंच, अंगाने मध्यम, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे व लांब असून अंगात हिरव्या रंगाचा टॉप व काळ्या रंगाची लेगिझ, गळ्यात सोन्याची चेन, पायात काळ्या रंगाची चप्पल, तिला मराठी व हिंदी भाषात बोलता येते.

सोबत मोबाईल फोन आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## स्वीफ्ट डिझायर गाडीच्या डिस्ककव्हरसह लोखंडी डिस्कची केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने स्वीफ्ट डिझायर गाडीच्या डिस्कव्हरसह लोखंडी डिस्कची चोरी केल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

जितेंद्र चव्हाण यांनी त्यांची स्वीफ्ट डिझायर गाडी एमएच-०६-सीडी-१२९२ ही सेक्टर २२ परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडीचे चार काळ्या रंगाचे टायर त्यात सिल्व्हर रंगाचे डिस्कव्हर व लोखंडी डिस्क असा मिळून जवळपास २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ३४ वर्षीय इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बाहेर जातो सांगून निघून गेलेला चौतीस वर्षे इसम घरी परत न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

रणजीत मलाई माहतो (राहणार, गोदरेज सिटी कॉलनी, खानावळे) हा मूळचा पश्चिम बंगाल येथील असून त्याचा रंग सावळा, चेहरा उभट, केस काळे आहेत. त्याची उंची पाच फूट, तीन इंच असून बांधा सडपातळ आहे. त्याने अंगात पांढऱ्या रंगाचा टीशर्ट आणि काळ्या रंगाची फूल पॅन्ट घातली आहे. त्याला बंगाली भाषा बोलता येते. या ईसमा बाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक प्रकाश मेहेर यांच्याशी संपर्क साधावा.

# धोक्याच्या दिवशीच पाऊस कमी पडला ; तरीपण प्रशासनासह सगळ्यांनाच नडला

### पोलादपूर तालुक्यात कोरोनाबळींची पन्नाशीकडे वाटचाल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात पावसाचा हाहाकार होण्याच्या शक्यतेने दि. १० ते १२ जून २०२१ दरम्यान प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली. पोलादपूर शहरातील बाजारपेठच बंद ठेवली तर आजूबाजूच्या गावांतील ग्रामस्थ खरेदीसाठी येणारच नाहीत, अशी क्लुप्ती अंमलात आणून त्यावर दंडात्मक कारवाईचा भार टाकला. परिणामी, गुरूवारपासून पावसाने अपेक्षेप्रमाणे जोरदार हजेरी लावली नसतानादेखील नगरपंचायतीचे कर्मचारी पावतीपुस्तक घेऊन बाजारपेठेत हजर झाले. अशाप्रकारे पोलादपूरमध्ये जोरदार पावसाच्या शक्यतेचा इशारा सगळ्यांनाच कामाला लावणारा ठरला.

पोलादपूर तालुक्यासह कोकणात हवामान खात्याच्या जोरदार पावसाच्या शक्यतेचा इशारा प्रशासनाकडून प्राप्त झाल्यानंतर तातडीच्या खबरदारीच्या उपाययोजनांनी वेग घेतला. प्रशासनाने बांधकाम उपविभागाला जेसीबी व झाडे पडल्यास कटर्स व तत्सम यंत्रणा सज्ज ठेवण्यास सांगितले, धामणदिवीसारख्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गामुळे दरडग्रस्त ठरू पाहणाऱ्या गावातील दरडप्रवण क्षेत्रातील घरांमधील ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलविण्यास सांगण्यात आले, पोलादपूर शहरातील उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्रालगतच्या घरांमधील नागरिकांनाही पूरस्थिती उदभवल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यास सांगण्यात आले, यासोबतच, गुरूवार पासून शनिवार पर्यंत खरेदीसाठी ग्रामस्थ ग्रामीण भागातून भर पावसातून पोलादपूर शहरामध्ये येऊ नयेत, यासाठी शहरातील बाजारपेठच बंद ठेवण्याचा लॉकडाऊन अजेंडा राबविण्यात आला.

गुरूवारी कसाबसा ८ मीमी पाऊस पडल्याची नोंद जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आली आणि बाजारपेठ विनाकारण बंद ठेवण्यात आल्याचे उघड झाले तरीही शुक्रवारी पोलादपूर शहरातील बाजारपेठ ठप्प ठेवण्याचा प्रयोग करण्यात आला. शुक्रवारी दिवसभरात केवळ ६७ मीमी पावसाची नोंद झाली. संपूर्ण जून महिन्याच्या पहिल्या दिवसापासूनची पावसाची नोंद २९८ मी मी झाली असताना दि. १० ते १२ जूनपर्यंत जोरदार पावसाचा इशारा देणाऱ्या अंदाजामध्ये दिवसाला २०० ते ३०० मीमी पाऊस पडेल, असे भाकित करण्यात आले होते. मात्र, हवामानखात्याच्या या अंदाजावर विसंबून जनजीवन ठप्प करण्याआधी हा वळवाचा पाऊस जास्तीतजास्त किती पडू शकतो, याचा अंदाज सामान्य जुन्याजाणत्या शेतकऱ्याकडून जाणून घेतला असता तरी त्याने या वळवाच्या पावसाच्या सरी सातत्यपूर्ण नसल्याची माहिती आयुष्यभराच्या अनुभवांती दिली असती.

शनिवारी सकाळी सात वाजल्यानंतर पावसाने लावलेली हजेरी कशीबशी नऊ वाजेपर्यंत संततधार ठेऊन राहिली आणि त्यानंतर ऊनसावलीचा खेळ दिवसभर सुरू होऊन दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास गुगलवरून पावसाची मोठी सर पडणार असा अंदाज वर्तविण्यात आला.

तोपर्यंत पावसाची मोठी सर कोसळून पुन्हा ऊन पडलं होतं. मात्र, गेल्या तीन दिवसांत अघोषितपणे सुरू असलेले कडक लॉकडाऊनचे निर्बंध शनिवारी पोलादपूर बाजारपेठेने झुगारून पुन्हा पूर्ववत दुकाने उद्योगधंदे सुरू झाले. कोकणातील शेती हा पावसावरील जुगार असे पाठ्यपुस्तकातील वर्णनानुसार या सर्व परिस्थितीला कोकणातील व्यापारधंदेदेखील पावसावरील जुगार ठरावेत, असे म्हणण्याइतपत विनाकारण संभाव्य धोक्यापेक्षा उपाययोजनांचाच बाऊ मोठा झाल्याचे दिसून आले.


### पोलादपूर तालुक्यात कोरोनाबळींची पन्नाशीकडे वाटचाल

पोलादपूर तालुक्यात यादरम्यान, कोरोना संसर्गाचा प्रादूर्भाव नियंत्रणात येऊनही मृत्यूदर अधिक होत असल्याचे दिसून येत आहे. दिवसभरात वावे येथे ४ व फणसकोंड येथे २ असे ६ रूग्णांची नोंद झाली असून पोलादपूर शिवाजीनगर येथील एक वृध्द रूग्ण दगावल्याने आतापर्यंत तालुक्यात कोरोनाबळींची संख्या ४७ झाल्याची माहिती तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे यांनी दिली. सुमारे १०३८ कोरोना रूग्णांपैकी ९२७ रूग्णांवर उपचार करून घरी सोडण्यात आले असून ६४ रूग्ण कोरोना बाधित असल्याचे दिसून आले आहे. यापैकी ४५ जणांवर घरामध्ये उपचार सुरू असून ११ जणांवर महाड कोविड केअर सेंटरमध्ये तर ८ जणांवर जिल्हा रूग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत, अशी माहिती यावेळी डॉ. सोनावणे यांनी दिली.

## म्हसळ्यात कोरोना पॉझिटीव्ह रुग्णसंखेत वाढ : आजपर्यंत ६६९ बाधीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या आजपर्यंत ६६९झाली, आज नवीन पॉझीटीव्ह रुग्ण ३ सापडले त्यामध्ये १ म्हसळा शहरातील २रुग्ण सकलप येथील आहेत. आज मयत वय ६८ (पु) निगडी येथील आहे. ६५बाधीत रुग्णांपैकी ४२ रुग्ण घरी विलगीकरण राहून उपचार घेत आहेत तर ७ जण श्रीवर्धन, ११ जण म्हसळा ग्रामिण रुग्णालयांत, तर ४ जण खाजगी रुग्णालयांत व १ कोव्हीड केअर सेंटर लोणेरे येथे उपचार घेत आसल्याचे तालुका आरोग्य अधिकारी यानी कळविले आहे. तालुक्यात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८५.२०% आहे तर आज पर्यंत ३४ जणांचा कोरोना मुळे मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.



तालुक्यात ४२ रुग्ण होम आयसोलेशन आहेत. अनेक रुग्ण घरी विलगीकरण असतानाही सुप्रर स्प्रेडर म्हणून फिरत आहेत. त्यामुळे अनेकांना कोरोनाची लागण होत आहे. या पार्श्वभूमीवर म्हसळा ग्रामिण रुग्णालयात पालकमंत्री आदीती तटकरे यानी ऑक्सिजनच्या उपलब्धतेसह ३० खाटांचे 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर' (डीसीएचसी) सुरू केले आहे त्याचा जास्तीत जास्त वापर होणे आवश्यक आहे. कोरोना व्हायरसच्या रुग्णांपासून इतर कुणालाही त्याची लागण होऊ नये यासाठी क्वारंटाईन केलं जातं. संसर्गजन्य आजारात रुग्णाच्या सोबत राहणाऱ्या व्यक्तींना आजार होण्याची शक्यता सर्वाधिक असते. तर रुग्णाच्या संपर्कात येणाऱ्यासगळ्यांनाच कोरोना व्हायरसपासून धोका आहे.

## भाजपाविरोधात आघाडी निर्माण करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ : नवाब मलिक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राजकारण्यांचा हुकमी एक्का म्हणून ओळख असणाऱ्या प्रशांत किशोर आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यात शुक्रवारी मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट झाली. भाजपचे फाइंड असणाऱ्या किशोर यांनी गेल्या निवडणुकीत शिवसेनेसाठी काम केलं होतं. आता, हेच प्रशांत किशोर राष्ट्रवादीच्या पवारांना भेटायला आल्याने काही नवीन गणिते जुळत आहेत का याची चर्चा रंगली आहे.

शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी प्रशांत किशोर शुक्रवारी सकाळी पोहोचले. त्यानंतर प्रशांत किशोर यांनी पवारांसोबत जेवणही केलं. या दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल साडे तीन तास चर्चा झाली. या भेटीदरम्यान काही काळ राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटीलही उपस्थित राहिले. त्यामुळे या भेटीवर अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसची कोणतीही जबाबदारी प्रशांत किशोर यांच्याकडे देण्यात आलेली नाही, असं मंत्री आणि राष्ट्रवादी



काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी सांगितले.

प्रशांत किशोर हे राजकीय रणनीतीकार आहेत. त्यांचा वेगळा अनुभव आहे. तो अनुभव आणि देशात राजकीय परिस्थिती काय आहे याची माहिती प्रशांत किशोर यांनी शरद पवारांना दिली, असं नवाब मलिक यांनी सांगितलं. तसेच प्रशांत किशोर यांच्याकडे राष्ट्रवादीच्या कॅम्पेनची किंवा इतर कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नाही. मात्र भाजपाविरोधात आघाडी निर्माण करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ, असं नवाब मलिक यांनी सांगितलं.


## लहान मुलांमधला कोविड- आम्हाला हे माहिती पाहिजे ; जिल्हाधिकारी कार्यालयाचा वेबिनार संपन्न

### जिल्हाधिकारी निधी चौधरी व डॉ. दाभाडकर यांचे मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लहान मुलांमधला कोविड आजार जिल्हयात येऊ नये, याकरीता कोविड स्वयंसेवकाबरोबरच आई- वडिलांची भूमिकाही महत्वाची आहे. ही तिसरी लाट जिल्हयात येणार नाही, याकरिता जिल्हा प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना केलेल्या आहेत. मात्र नागरिकांनी आणि पालकांनी आवश्यक खबरदारी घेण्याकरिता सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व संस्था, संघटनांनीही प्रबोधन करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी लहान मुलांमधला कोविड-आम्हाला हे माहिती पाहिजे या वेबिनारच्या उद्घाटन प्रसंगी केले.

हा वेबिनार रायगड जिल्हाधिकारी कार्यालय व स्वदेश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. जिल्हयातील विविध संस्था-संघटनांचे २४० स्वयंसेवक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु करण्यात आलेल्या रायगड कोविड हेल्पलाईन मध्ये कार्यरत आहेत. या स्वयंसेवकांसाठी रायगड जिल्हयातील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ व इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स या राष्ट्रीय संस्थेचे माजी उपाध्यक्ष डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांचे मार्गदर्शन दि. १० जून रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटक जिल्हाधिकारी निधी चौधरी होत्या. डॉ.चंद्रशेखर दाभाडकर यांच्याबरोबर संवादक म्हणून पोलादपूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश शिंदे होते. सर्वांचे स्वागत स्वदेस फाऊंडेशनचे तुषार इनामदार यांनी केले. या वेळी डॉ.दाभाडकर यांनी लहान मुलांतील कोविड व्याप्ती, गांभीर्य, तिसरी लाट व मुले कोविडग्रस्त मुलांची तसेच मुलामध्ये हा आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी, प्रतिबंधक उपाय, कुपोषण व कोविड चौरस आहार व कुपोषणाचा जटील प्रश्न, स्तनदा व गर्भवती माता यांनी घ्यावयाची काळजी व त्यांच्यातील लसीकरण, सामाजिक कार्यकर्त्यांची



जबाबदारी या अनेक विषयावर समुपदेशनाच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

लहान मुलांना औषधे देताना, तपासण्या करताना तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेवूनच औषधे द्या, स्टिरॉईडसारखी इतर औषधे मनानेच देऊ नका. औषधापेक्षा सकस व चौरस आहाराकडे लक्ष द्या अशा अनेक मुद्यांना स्पर्श केला. याबरोबरच मूल सौम्य आजाराकडून गंभीर आजाराकडे मार्गक्रमण करणार नाही व गंभीर आजाराची लक्षणे व योग्य त्या वेळेस संदर्भित करणे याविषयी द्रुक श्राव्य माध्यमातून बहुमोल मार्गदर्शन केले.

लॉकडाऊनमुळे पालक घरात आहेत, बेरोजगारी वाढली आहे. आर्थिक समस्या आहेत. इतर अनेक सामाजिक प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत. त्याचा परिणाम लहान मुलांच्या मानसिकतेवर होत आहे. याबरोबरच मुलांच्या शाळा बंद आहेत, मैदानी खेळ बंद आहेत, त्यामुळे त्यांना शारिरीक व मानसिकदृष्ट्या समस्या सुरु झाल्या आहेत. लहान मुलांची मानसिक समस्या जाणून घ्यावी, त्यांना समजून घ्यावे, हे आवर्जून सांगितले. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये, समाज माध्यमातून येणाऱ्या उपचारावर, अफवांवर विश्वास ठेवू नये व या कठीण काळात शासन, प्रशासन, पोलीस व डॉक्टर्स यांना सहकार्य करावे, असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती भावना पांडे यांनी केले तर उपजिल्हाधिकारी श्रीमती वैशाली माने यांनी आभार मानले. अनेक कार्यकर्त्यांनी डॉ. दाभाडकर यांनी अत्यंत अवघड विषय अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितल्याबद्दल व समुपदेशनाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.


**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९


## अल्पवयीन मुलांना दुचाकी व मोबाईल चोरी प्रकरणी गुन्हे मध्यवर्ती शाखेने केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुचाकी व मोबाईल चोरीच्या गुन्हयांमध्ये अलिकडच्या काळात अल्पवयीन मुलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला असल्याच्या घटना पोलिस तपासातून समोर येत असल्याने समाजासाठी ही निश्चिच धोक्याची बाब आहे. ताज्या घटनेत, नवी मुंबई गुन्हेशाखा मध्यवर्ती कक्षाच्या पोलिसांनी दोघा अल्पयीन गुन्हेगारांना जेरबंद करून नवी मुंबईतील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत या दुकलीने केलेले सात दुचाकी व सहा मोबाईल चोरीचे असे एकूण १३ गुन्हे उघडकीस आणत एकूण चार लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त केला आहे.



नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत दुचाकी व मोबाईल चोरीसह इतर गुन्हयांच्या घटनांत वाढ झाल्याची बाब लक्षात घेवून पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त डॉ. बी.जी. शेखर पाटील यांनी विशेष मोहीम राबवुन कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त प्रविणकुमार पाटील व सहायक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने मोहीम हाती घेतली असतांनाच, दुचाकी व मोबाईल चोरणारे दोघे अल्पवयीन मुले उलवे भागात येणार असल्याची माहिती मध्यवती कक्षाचे पोलीस अंमलदार लक्ष्मण कोपरकर व राहुल वाघ यांना खबऱ्याकडून मिळाली होती. त्यानुसार सदरठिकाणी सापळा लावून सदर दोघा मुलांना पोलिस पथकाने ताब्यात घेवून त्यांच्याकडे मिळून आलेल्या दुचाकीबाबत विचारपुस केली असता, त्यांनी सदरची दुचाकी पनवेल शहर येथुन चोरी केल्याचे कबुली दिली. यानंतर त्यांच्याकडे पथकाने अधिक चौकशी केली असता, सदर दोघांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील पनवेल, पनवेल तालुका, खांदेशर, न्हावाशेवा, खारघर,रबाळे व उरण या सात पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन ८ मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिल्याने सदर दोघांकडून पोलिसांनी सुमारे ३ लाख ३० हजार रुपयांच्या ७ मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या. तसेच तपासादरम्यान या दुकलीकडून पोलिसांनी सुमारे ९५ हजारांचे ६ महागडे मोबाईल फोन हस्तगत केले असून सदरचे मोबाईल या दोघांनी नवी मुंबईतील उलवे, सानपाडा, खारघर, कळंबोली व वाशी या परिसरातुन स्नॅचिंग केल्याचे कबूल केले. यावरून या दुकलीकडून पोलिसांनी दुचाकी व मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस आणत एकूण ४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमालही हस्तगत केला असून या दुकलीकडून अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत असून त्यादृष्टीने अधिक तपास सुरु आहे. मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय राजेश गज्ञल, पीएसआय संजय पवार, पोलीस अंमलदार सतिश सरफरे, अतिश कदम, लक्ष्मण कोपरकर, राहुल वाघ, शशिकांत शेंडगे, विष्णु पवार, मेघनाथ पाटील, सतिश चव्हाण आदींच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

## जिल्हा माहिती भवन उभारण्यासाठी आदिती तटकरेंकडून प्रस्तावित जागेची पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आधुनिक काळाच्या गरजेनुसार जिल्हा माहिती कार्यालयाची माहिती व तंत्रज्ञानावर आधारीत अत्याधुनिक इमारत व सुसज्ज मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. भविष्याचा अचूक वेध घेवून दूरदृष्टी ठेवून कार्यरत असणाऱ्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी ही गरज ओळखून त्यादृष्टीने माहिती व तंत्रज्ञानावर आधारीत अत्याधुनिक जिल्हा माहिती कार्यालयाचे जिल्हा माहिती भवन उभारण्यासाठी अलिबागमधील पिंपळभाट येथील प्रस्तावित जागेची आज (दि.१२ जून) रोजी पाहणी केली.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे खासगी सचिव डॉ.जगन्नाथ वीरकर, कार्यकारी अभियंता राहुल मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार सचिन शेजाळ, कनिष्ठ अभियंता श्री.राहुल बागूल, कनिष्ठ अभियंता कु. धनश्री भोसले आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी नियोजित जिल्हा माहिती भवन विषयी बोलताना सांगितले की, आधुनिक काळात माहिती व तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करुन विविध प्रसारमाध्यमांपर्यंत तसेच जनतेपर्यंत शासनाच्या योजनांची तसेच शासनाच्या विविध कामांची माहिती तत्परतेने पोहोचविणे, ही एक अत्यावश्यक बाब बनली आहे. जिल्हा माहिती कार्यालय नेमके हेच काम करते. त्यांच्या या कार्याला अधिक सुसूत्रता येण्यासाठी, त्यांचे कार्य अधिक गतिमान होण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन प्रसिध्दीविषयी कामकाज अधिक उत्तमरित्या होण्यासाठी त्याचबरोबर प्रसारमाध्यम प्रतिनिधींना जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून माहिती प्रसारणाच्या कामाच्या दृष्टीने अत्याधुनिक सोयी-सुविधा मिळण्यासाठी हे अद्ययावत जिल्हा माहिती भवन निश्चित उपयुक्त ठरेल. या माहिती भवनात जिल्हा माहिती कार्यालय, मिनी थिएटर, मिनी स्टुडियो, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मीडिया सनियंत्रण कक्ष, प्रदर्शन दालन, विविधोपयोगी सभागृह, डिजिटल वाचनालय, प्रसारमाध्यम प्रतिनिधींकरिता अद्ययावत प्रसारमाध्यम कक्ष,आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र अशा विविध बाबी प्रस्तावित आहेत. रायगड जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे भूषण ठरेल असे जिल्हा माहिती भवन उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येईल, असे त्यांनी शेवटी सांगितले.